विद्युत शुल्क सूट व परतावा संबंधी निर्णय घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीस मुदतवाढ देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ जून, २०१९

वाचा :- शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि. ८.७.२०१६

संदर्भ :- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि. ३.८.२०१६

२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि. २४.११.२०१६

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इएलडी -२०१३/प्र.क्र.७९/भाग-१/ऊर्जा-१, दि. २९.४.२०१७

शासन निर्णय :-

विद्युत शुल्क सूट व परतावा संबंधी सुधारीत कार्यपध्दतीच्या उपरोक्त वाचा मधील दिनांक ८ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ मध्ये विद्युत शुल्क सूट/परताव्याची जुन्या कालावधीतील म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ अगोदरची प्रकरणे संबंधित ग्राहकांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत सादर करण्याची मुभा देण्यात आली होती. तद्नंतर दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पूर्वीची प्रकरणे कोणत्याही परिस्थितीत वीज वितरण कंपन्यांनी/विद्युत निरीक्षकांनी विचारात घेवू नयेत. जुन्या कालावधीतील जी प्रकरणे यापूर्वीच ग्राहकांनी सादर केलेली आहेत, त्याबाबत वीज वितरण कंपन्यांनी/विद्युत निरीक्षकांनी उपलब्ध अभिलेखाच्याद्वारे सखोल पडताळणी करून दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी निकाली काढावीत, असे नमूद केले होते.

२. आता या शासन निर्णयान्वये दि. ३१ मार्च, २०१९ पर्यंत पात्रता प्रमाणपत्र निर्गमित झालेली असल्यास विद्युत शुल्क सूट/परताव्याची जुन्या कालावधीतील म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ अगोदरची प्रकरणे संबंधित ग्राहकांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत सादर करता येतील. समितीव्दारा पुढील काळात याबाबत निकाली काढण्यात येईल. वीज वितरण कंपन्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी ही बाब जाहीर सूचनेव्दारे ग्राहकांच्या निदर्शनास आणण्याबाबत योग्य कार्यवाही करावी.

३. उद्योग संचालनालयाकडून दि. ३१ डिसेंबर, २०१५ पूर्वीच्या प्रकरणी, दि. ३१ मार्च,२०१९ पर्यंत देण्यात आलेल्या पात्रता प्रमाणपत्राच्या प्रकरणी दि. ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत संबंधित ग्राहकांकडून अर्ज घेण्यास वीज कंपन्यांना मुभा देण्यात येत आहे. तसेच दि. ३१ मार्च, २०१९ नंतर पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्यास त्यास पात्रता प्रमाणपत्र मिळाल्यापासून ६ महिन्याच्या आत ग्राहकांनी सादर करण्यात यावीत. दि. ३१ डिसेंबर, २०१५ नंतरच्या ग्राहकांकडून प्राप्त अर्जाच्या प्रकरणी, उद्योग घटकास दि. ३१ मार्च, २०१९ पर्यंत पात्रता प्रमाणपत्र मिळाले असल्यास त्यास दि. ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत अर्ज करावयाची मुभा देण्यात आली आहे. तसेच दि. ३१ मार्च,२०१९ नंतर प्राप्त झालेल्या प्रमाणपत्राबाबत, असे प्रमाणपत्र मिळाल्यापासून ६ महिन्याच्या आत अर्ज स्विकारण्यास मुभा देण्यात येत आहे.

४. जिल्हा समितीव्दारा दि. ३१ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत किती प्रकरणे निकालात काढली आहेत याची प्रत्येक योजना/धोरणानुसार माहिती द्यावी.

५. विद्युत निरीक्षक यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समितीव्दारा परताव्याच्या प्राप्त व प्रलंबित प्रकरणाचा आढावा घ्यावा. प्रथम दि. ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी निकाली काढावयाची प्रकरणे प्राथम्याने निकाली काढण्यात यावीत. ती कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित ठेवण्यात येऊ नयेत. अशा निकाली काढलेल्या प्रकरणाचा तपशील मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालयास द्यावा.

६. दि. ३१ डिसेंबर, २०१५ पूर्वीची परंतु दि. ३० सप्टेंबर, २०१६ नंतर अर्ज प्राप्त झालेल्या प्रकरणाची माहितीही वेगळयाने द्यावी.

७. जिल्हा समितीव्दारे दर महिन्यात घेतलेल्या बैठकीअंती अनुज्ञेय केलेल्या प्रकरणांचा जिल्हानिहाय, प्रत्येक योजना/ धोरणनिहाय, अनुज्ञेय केलेल्या उद्योग घटकांची संख्या, परताव्याकरिता अनुज्ञेय केलेल्या वीज कंपनीनिहाय रक्कम याबाबतचा अहवाल, पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मुख्य विद्युत निरिक्षक कार्यालयास पाठवावा. मुख्य विद्युत निरिक्षकांनी शासनास सादर करण्यात येणाऱ्या मासिक महसूली जमा विवरणपत्रात याचा वेगळयाने समावेश करावा.

८. प्रत्येक वीज घटकांनी त्यांच्याकडील उद्योगघटकांस जिल्हास्तरीय/ राज्यस्तरीय समितीने अनुज्ञेय केलेला परतावाच्या रकमेतून प्रत्येक महिन्याच्या बिलिंग सायकलमध्ये अनुज्ञेय केलेल्या परताव्याच्या रकमेचा तपशील मुख्य विद्युत निरिक्षक कार्यालयास दर महिन्यास सादर करावा. यात वीज कंपन्यांना अनुज्ञेय करण्यात आलेली रक्कम, उद्योग घटकांची संख्या, बिलिंग सायकलमध्ये उद्योग घटकांना अनुज्ञेय केलेली रक्कम याची योजनानिहाय/ धोरणनिहाय माहिती द्यावी. मुख्य विद्युत निरीक्षक यांनी असा तपशील मासिक जमा महसूलाच्या विवरणपत्रासोबत द्यावा.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२११११३९३३६०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2019.06.21 11:37:52 +05'30'

(प्र.पुं.बडगेरी)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
६. मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
७. अप्पर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२
८. अप्पर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२
९. प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई-३२
१०. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्र. १, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
११. मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ३रा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू), मुंबई-७१
१२. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.

१३.महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
१४.महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) -२ महाराष्ट्र नागपूर
१५.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६.अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
१७.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१८.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सुत्रधार कंपनी हाँगकाँग बिल्डींग, ४ था मजला, हुतात्मा चौक, मुंबई-२३
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२१.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२२.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२३.वित्त विभाग (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
२४.व्यवस्थापकीय संचालक, द टाटा पावर कंपनी लिमिटेड, बॉम्बे होऊस, २४, होमी मोदी स्ट्रिट,मुंबई-४००००१
२५. व्यवस्थापकीय संचालक, अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड, देवीदास लेन, एस.व्ही.पी. रोड, देवीदास टेलिफोन एक्सचेंज जवळ, बोरीवली (प.), मुंबई-४०००१३
२६.महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई-०५
२७.सर्व विद्युत निरीक्षक
२८.सर्व जिल्हा उद्योग अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्र
२९.निवड नस्ती.